मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » गुरुवार, दि. 6 जून 2024 | पान- 1

# बारणेंच्या विजयात चिंचवडचा सिंहाचा वाटा!

## स्थानिक उमेदवार असूनही संजोग वाघेरे राहिले पिछाडीवर : मावळ, कर्जत, उरणमध्ये वाघेरे-बारणे यांच्यात चुरशीची लढत

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी ९६ हजार ६१५ मते घेत तिस-यांदा खासदार म्हणून निवडणूक जिंकली आहे. मात्र, बारणे यांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे अडीच लाखाचे मताधिक्य मिळविता आले नाही. चिंचवड, पिंपरी आणि पनवेल वगळता बारणे यांना सर्वाधिक लीड घेता आले नाही.

मावळ, कर्जत आणि उरणमध्ये बारणे आणि वाघेरे यांच्यात अटीतटीचा चुरशीची लढत पहावयास मिळाली. त्यामुळे चिंचवडचे सुमारे ७४ हजार ७६५, पनवेलमधून ३१ हजार तर पिंपरीतून १६ हजार ७३१ या तिन्ही विधानसभेतून चांगले लीड वगळता अन्य मतदारसंघात बारणे यांना मताधिक्य घेता आले नाही. केवळ पिंपरी-चिंचवड शहरातून सर्वाधिक ली़ड मिळाल्याने त्यांच्या विजय मार्ग सोपा झाला. तर महाविकास आघाडीचे संजोग वाघेरे हे स्थानिक असूनही त्यांना प्रभाव दाखविता आला नाही. त्यामुळे पिंपरी चिंचवडमधून बारणे ९० हजाराचे मताधिक्य मिळवले आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात ३३ उमेदवार रिंगणात होते. मावळमध्ये २५ लाख मतदारांपैकी १४ लाख १८ हजार ४३९ मतदारांनी प्रत्यक्ष मतदानाचा हक्क बजावला होता. बालेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलामध्ये चोख पोलीस बंदोबस्तामध्ये मावळ मतदार संघातील मतमोजणीला सकाळी आठ वाजता सुरुवात झाली.

पहिल्या फेरीपासून श्रीरंग बारणे आघाडीवर होते. ते शेवटपर्यंत बारणे त्यांची आघाडी कायम राहिली. महाविकास आघाडीच्या संजोग वाघेरे यांना बारणे यांची आघाडी तोडता आली नाही. शेवटच्या 26 व्या फेरीत बारणे यांचा विजय जाहीर करण्यात आला. बारणे यांना मागील दोन लोकसभा निवडणुकीचा अनुभव आहे. २०१४, २०१९ या दोन्ही लोकसभा निवडणुकीत भाजप-शिवसेनेच्या युतीमुळे बारणे यांचा विजय सर्वाधिक मताधिक्याने झाला. पण, यंदा राज्यात पक्ष फोडाफोडीच्या राजकारण झाले. त्यामुळे मावळात शिवसेना विरुध्द शिवसेना (उबाठा गट) अशी लढत झाली. या लढतीकडे राज्याचे लक्ष लागले होते. बारणे हे हॅट्रीक मारणार की संजोग वाघेरे काय चमत्कार घडवणारे, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

दरम्यान, दोन वेळा खासदार असूनही बारणे यांना त्यांच्या अडीच लाख अपेक्षेप्रमाणे मताधिक्य मिळविता आले नाही. केवळ ९६ हजार मतावर विजय मिळवता आले. त्यात चिंचवड विधानसभेचा सर्वाधिक वाटा राहिला आहे. पनवेलमधून आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह शिवसेनेने केलेल्या कामामुळे ३१ हजाराचे लीड मिळाले. पण, कर्जत, उरण विधानसभेत बारणे यांच्या ऐवजी संजोग वाघेरे या नवख्या उमेदवाराला पसंती मिळाली. मावळ विधानसभेत राष्ट्रवादी आमदार सुनिल शेळके आणि भाजप माजी आमदार बाळा भेगडे हे दोघे असतानाही बारणे यांना साडेचार हजाराचे मताधिक्य मिळाले आहे. त्या विधानसभेत संजोग वाघेरे यांनी चांगली लढत दिली. तसेच चिंचवडमधून बारणे यांना ७४ हजार ७६५ तर पिंपरीतून १६ हजार ७६१ इतके मताधिक्य मिळाले.



### मावळात नातीगोती कामाला आलीच नाहीत!

» पिंपरी गावातील भाजपचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी श्रीरंग बारणे यांचा महायुती म्हणून केलेला प्रचार आणि गावकी-भावकी, नातीगोती असे असतानाही एक वाघेरे दुसऱ्या वाघेरेविरोधात शड्डू ठोकून उभा राहिल्याने नात्यागोत्याचे राजकारण मावळमध्ये यंदा चालले नाही. उलट नातीगोतीच उलटली की काय, असा प्रश्न निकालावरून आता उपस्थित होत आहे.

# देहूत इंद्रायणी नदी पात्र प्रदूषितच

## इंद्रायणी नदीचे प्रदूषण अद्यापही कायम : वेळीच प्रदूषणाला आळा घालण्याची गरज

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारी अगदी काही दिवसांवर आली असून या वारीसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून श्री क्षेत्र देहू येथे येत असतात. मात्र, इंद्रायणी नदीचे प्रदूषण अद्यापही कायम असून देहूत नदीपात्रातील जलपर्णीची दिवसेंदिवस वाढ होत आहे. प्रदूषित पाणी पवित्र तीर्थ म्हणून सेवन करणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे वेळीच प्रदूषणाला आळा घालण्याची गरज आहे.

जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा आषाढी वारीसाठी येत्या २८ जूनला श्री क्षेत्र देहूतून श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. या पार्श्वभूमीवर, देऊळवाडा आणि वैकुंठस्थान जवळील इंद्रायणीचे पात्र स्वच्छ कधी होणार? अशी विचारणा स्थानिक नागरिक आणि भाविक करत आहेत.



देहू ग्रामपंचायतीने योग्य नियोजन करून इंद्रायणीच्या पात्रात जलपर्णीला काही प्रमाणात आळा घातला होता. परिणामी संत तुकाराम महाराज देऊळवाडा आणि वैकुंठस्थानाजवळील इंद्रायणीचे पात्र स्वच्छ होते. तसेच या भागात नौकानयनही सुरु होते.

मात्र, गेल्या दोन वर्षांपासून देहूतील संत तुकाराम महाराज देऊळवाडा आणि वैकुंठस्थानाजवळील नदीपात्रात जलपर्णी सतत वाढत आहे. त्यामुळे, भाविकांची गैरसोय होत आहे. तर, देवदर्शनासाठी इंद्रायणी नदीचे पाणी पवित्र तीर्थ म्हणून सेवन करण्याची वारकऱ्यांमध्ये प्रथा आहे.

मात्र, इंद्रायणीचे पाणी दूषित असल्याने वारकऱ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. आगामी काळातील पायी पालखी सोहळ्याच्या दृष्टीने देहू नगरपंचायतीच्या वतीने नदीपात्रातील जलपर्णी काढून इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करून वारकऱ्यांसाठी स्वच्छ असे इंद्रायणी पात्र उपलब्ध करून द्यावे.

# पुणे जिल्ह्यात फिफ्टी-फिफ्टी

## अजित पवारांना धक्का, धंगेकरांचा करिष्मा चालला नाही, कोल्हे यांनी पेलले ‘पॉवर’फुल आव्हान

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत पुणे जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडीला फिफ्टी-फिफ्टी यश मिळाले आहे. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे. नणंद-भावजय यांच्या लढाईत शरद पवार यांच्या कन्या आणि विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांनी बाजी मारली.

पुण्यामध्ये धंगेकरांच्या ‘कसबा पॅटर्न’चा करिष्मा चालला नाही. मुरलीधर मोहोळ यांनी आश्वासक फरकाने पुण्याची जागा जिंकली. अजित पवारांनी खुन्नस दाखवत दिलेले आव्हान शिरूरमध्ये डॉ. अमोल कोल्हे यांनी यशस्वीपणे पेलत मोठा विजय मिळविला. मावळमध्ये विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी हॅटट्रिक साधली.



पुणे शहर लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे मुरलीधर मोहोळ यांनी सहज विजय मिळविला. मोहोळ यांनी १,२१,२३१ मतांनी विजयी मिळविला. सहाही विधानसभा मतदारसंघात मोहोळ यांनी आघाडी घेतली. बारामती लोकसभा मतदारसंघात मात्र धक्कादायक निकाल लागला. मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे श्रीरंग बारणे यांनी ९६,६१५ मतांनी उध्दव ठाकरे गटाचे संजोग वाघिरे यांच्यावर मात केली.

### खडकवासल्यानेही सुनेत्रा पवारांना तारले नाही

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांना खडकवासला मतदारसंघाकडून मोठ्या मताधिक्याची अपेक्षा होती. मात्र, खडकवासल्यातून त्यांना केवळ २१ हजार मतांची आघाडी मिळाली. मात्र, इतर पाचही विधानसभा मतदारसंघात सुळे यांनी मोठी आघाडी घेतली. त्यामुळे सुळे यांनी तब्बल १,५३,०४८ मतांनी विजय मिळविला.

दरम्यान, सुप्रिया सुळे या २००९ पासून सातत्याने लोकसभा मतदारसंघातून खासदार आहेत आणि येथून तीनदा विजयी झाल्या आहेत. २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी भाजप उमेदवार कांचन राहुल कूल यांचा पराभव केला होता. बारामती लोकसभा जागेसाठी तिसऱ्या टप्प्यात म्हणजेच ७ मे रोजी मतदान झाले. येथे एकूण २१ लाख १४ हजार ६६३ मतदार असून त्यापैकी पुरुष मतदार ११ लाख १२ हजार ३५७ तर महिला मतदार १० लाख २ हजार २७३ मतदार आहेत.

### अमोल कोल्हेंना सहाही मतदारसंघातून आघाडी

» राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे डॉ. अमोल कोल्हे यांनी सहाही विधानसभा मतदारसंघातून मताधिक्य मिळविले. त्यांना सर्वाधिक ५५ हजारांचे मताधिक्य खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघातून मिळाले. विशेष म्हणजे, भाजप आमदार महेश लांडगे यांच्या भोसरीमधूनही त्यांनी अनपेक्षितपणे ९ हजारांचे मताधिक्य मिळवले.

# पुण्यात ढगफुटी, तासाभरात पाणीचपाणी!

## मान्सूनपूर्व पावसाचा तडाखा : नगर रस्ता परिसराला सर्वाधिक फटका

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात मान्सूनपूर्व पावसाने अवघ्या तासाभरात शहर जलमय केले. हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार वडगावशेरीत अवघ्या तासाभरात तब्बल ११४ मि. मी. पावसाची नोंद झाली. त्यामुळे धानोरीत मुख्य रस्त्यावर तब्बल चार फुटांपेक्षा अधिक पाणीसाचून तळी साचली होती. तसेच लक्ष्मीनगर येथे डोंगरावरून आलेले पाणी थेट रस्त्यावर आल्याने अनेक दुकानांमध्ये पाणी शिरण्यासह चारचाकी वाहनेही अडकून पडली होती.



शहरात मंगळवारी वडगावशेरीसह स्वारगेट, नगररस्ता, खराडी, कात्रज, धनकवडी, सातारा रस्ता, विठ्ठलवाडी, धायरी, स्वारगेट, गोखलेनगर, शिवाजीनगर, पुणे स्टेशन भागांतही अनेक ठिकाणी रस्त्यावर पाण्याची तळी साचली होती. तर दुसरीकडे अवघ्या काही वेळात इतके पाणी साचले, तरी महापालिकेचे जवळपास सर्वच कर्मचारी लोकसभा निवडणुकीच्या निकालात असल्याने पाण्याचा निचरा करण्यासाठी कोणीही उपलब्ध नसल्याने नागरिकांनीच पुढाकार घेत पाण्याला वाट करून दिली.

या पावसाने विश्रांतवाडी, धानोरी रस्ता, कल्याणीनगर, गोकूळ नगर, टिंगरेनगर, विमानननगर, नगररस्ता येरवडा भागाला सर्वाधिक फटका बसला पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने रस्त्यावर वाहने अडकून पडली. तर, नागरिकांनी जीव वाचविण्यासाठी वाहने रस्त्यातच सोडणे पसंत केले. त्यानंतर रात्री उशीरा पर्यंत पाणी निचरा होण्याची वाट पाहण्यात आली. मात्र, ही वाहने अडकून पडल्याने रस्त्यांवर दुर्तफा वाहतूक कोंडी झाल्याने नागरिकांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला.

### शहरात वाहतूक कोंडी

» शहराच्या अनेक भागात मोठया प्रमाणात पाणी साचल्याने मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. त्यात, हडपसर स्वारगेट रस्ता, स्वारगेट- सातारा रस्ता, सिंहगड रस्ता, रूबी हॉल ते बंडगार्ड, गुंजन चौक नगररस्ता, कर्वे रस्ता अनेक भागात मोठया प्रमाणात रस्त्यावर पाणी आल्याने वाहतूक मंदावली त्यामुळे या कोंडीने शहराच्या इतर भागात मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे पहायला मिळाले.

धानोरीमधील लक्ष्मीनगर येथे सर्वाधिक नुकसान झाले आहे. नागारिक तसेच लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करून या भागात महापालिकेकडून कामेच केली जात नसल्याने ही स्थिती उद्भवली आहे.

- अनिल उर्फ बॉबी टिंगरे, माजी नगरसेवक

# मेट्रो कामाची डेडलाईन पाळणार का?

## शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम मार्च 2025 पर्यंत प्रवाशांच्या सेवेत येणार?


**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम प्रगतिपथावर आहे. मार्च २०२५ पर्यंत या मेट्रो मार्गाचे काम पूर्ण होऊन तो प्रवाशांच्या सेवेत येणार असल्याचे सांगण्यात येते. सद्यस्थितीत ६५ टक्के काम पूर्ण झाले असून, येत्या १० महिन्यांत जवळपास ३५ टक्के काम पूर्ण करावे लागणार आहे. हिंजवडीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ही मेट्रो वरदान ठरणार आहे. मात्र, या कामामध्ये गती वाढवण्याची मागणी होऊ लागली आहे.

शिवाजीनगर ते हिंजवडी-माण या तिसऱ्या मेट्रो मार्गाच्या कामासाठी वाकड आणि हिंजवडी (फेज १) या भागात गर्डर आणि खांबावर पिअर कॅम्प बसवण्याचे सुरू आहे. माण-हिंजवडी-शिवाजीनगर हा २३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग आहे. या मार्गावर जवळपास साडे नऊशे पीलर असणार आहेत. पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्याकडे या प्रकल्पाचे नियंत्रण आहे. केंद्र सरकारच्या मेट्रो रेल धोरण २०१७ अन्वये सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर 'संकल्पना करा, बांधा, अर्थपुरवठा करा, चालवा आणि हस्तांतर करा' मॉडेल अंतर्गत राबवण्यात येत असलेला हा पहिला प्रकल्प आहे.

या तत्त्वावर टाटा समूहाने हे काम हाती घेतले आहे. या प्रकल्पासाठी ८ हजार ३१३ कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. मध्यंतरी या मेट्रोच्या कामासाठी केंद्र शासनाकडून ४१० कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यानंतर या कामाची काहीशी गती वाढली होती.

नोव्हेंबर-२०२३ अखेरपर्यंत मेट्रो लाईन–३ प्रकल्पाचे भौतिक काम सुमारे ५१.१४ टक्के झाले होते. त्यानंतर डिसेंबरअखेर ते काम ५५ टक्केपर्यंत झाले. त्यानंतर २०२४ मध्ये म्हणजेच सद्यस्थितीत हेच काम ६५ टक्क्यांपर्यंत झाल्याचे सांगण्यात येत आहे. नोव्हेंबर २४ पर्यंत चाचण्या पूर्ण होऊन मार्च २०२५ पर्यंत मेट्रो ऑपरेशन सुरू होईल, असे सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षात मात्र, ही डेडलाईन पाळण्यासाठी मेट्रोच्या कामाची गती आणखीन वाढवावी लागणार आहे. त्यातच पावसामुळे या कामावर आणखी व्यत्यय येण्याची शक्यता आहे . त्यामुळे या कामाची डेडलाईन पाळली जाणार का, याबाबत अधिकारी ठाम बोलण्यास तयार नाहीत.





> मेट्रोच्या कामाला कोणतीही मुदतवाढ देण्यात आली नाही. कामाचा आढावा वेळोवेळी घेण्यात येत आहे. लवकरच ते काम पूर्ण होईल. दिलेल्या वेळेत मेट्रो धावेल.
> - रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए

### रुळ बसवण्याचे काम सुरु

» सध्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे खांब बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे. स्थानक उभारणी सुरू आहे. रुळ बसवण्याचेही काम सुरू झाले आहे. त्याचे आतापर्यंत २५ टक्के काम पूर्णत्वाकडे आहे. वाकड आणि हिंजवडी फेज १ या भागात गर्डर आणि खांबावर पिअर कॅप बसवण्यास वेग आला आहे.

### या स्थानकांचा समावेश

» मेगापोलीस सर्कल, एम्बेसी क्वाड्रॉन बिझनेस पार्क, डोहलर, इन्फोसिस फेज २, विप्रो फेज २, पाल इंडिया, शिवाजी चौक, हिंजवडी, वाकड चौक, बालेवाडी स्टेडियम, एनआयसीएमएआर, रामनगर, लक्ष्मीनगर, बालेवाडी फाटा, बाणेर गाव, बाणेर, कृषी अनुसाधन, सकाळनगर, विद्यापीठ, आरबीआय, कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर आणि दिवाणी न्यायालय आदी मार्गांचा समावेश आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गापैकी वाकड चौक ते मेगापोलीस सर्कल साडे आठ किलोमीटरचे अंतर असून एकूण नऊ स्थानके असणार आहेत.

# भाजपतर्फे जागतिक पर्यावरण दिनी 7 हजार झाडांचे रोपण

## शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या संकल्पनेतून पिंपरी चिंचवडमध्ये 1450 बुथप्रमुखांनी पाच झाडे घेतले दत्तक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडकरांच्या अवतीभवती सदा वृक्षराजी बहरलेली असावीत, यासाठी पिंपरी-चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या संकल्पनेतून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बुधवारी ५ जून रोजी शहरात ७ हजार झाडे लावण्यात आले. पक्षाच्या प्रत्येक बुथ प्रमुखाच्या माध्यमातून त्या त्या भागात पाच झाडांची लागवड करून हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. शहरात शुद्ध हवा आणि ऑक्सिजनचे प्रमाण वाढविण्यासाठी वड, पिंपळ, चिंच, कडुनिंब, उंबर यांसारख्या देशी झाडांची लागवड करून ते झाडे बुथप्रमुखांनी दत्तक घेतले, अशी माहिती शंकर जगताप यांनी दिली.



जल, जमीन आणि जंगल हे पर्यावरणाचे कान, नाक आणि डोळे आहेत. यापैकी कोणत्याही घटकाला झालेली इजा पर्यावरणासाठी घातक ठरत आहे. वातावरणातील कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड व मिथेन या वायूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यावरण ही आज जगासमोरील ज्वलंत समस्या बनली आहे. निसर्ग संपत्तीचा ऱ्हास, पर्यावरण ऱ्हास, महापूर, चक्रीवादळे, दुष्काळ, जंगलातील वनवे, समुद्राच्या पाण्याच्या पातळीतील होणारी वाढ, ऋतुचक्रातील बदल, विविध प्रकारची महामारी अशा भयानक संकटांनी अनेक वनस्पती, पशु-पक्षी यांच्या जाती नष्ट होत असून, त्याची भयानकता मानवाच्या अस्तित्वावरही घाला घालत आहे.

सुमारे पाच वर्षांपूर्वी कोव्हीड-१९ चा विषाणूने अफाट बुद्धिमान, हुशार आणि शक्तिशाली असलेल्या मानवाला घरात बंदिस्त केले. रात्रंदिवस धावणाऱ्या जगाला कोरोनाने स्तब्ध करून ठेवले. या महामारीने समस्त जगासाठी एक स्पष्ट संदेश दिला आहे. तो मानवाने समजून घेऊन, आपल्या वृत्तीत आणि कृतीत सुधारणा करणे वर्तमानाची गरज व भविष्याची मागणी आहे. या निसर्गाची 'इकोसिस्टीम' पुन्हा एकदा प्रस्थापित करण्याचा संकल्प गरजेचा आहे. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संपूर्ण शहरात ७ हजारहून अधिक झाडांची लागवड केली, असे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले. शहरात विविध ठिकाणी झालेल्या या उपक्रमामध्ये सोसायटीधारक, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला तसेच शहर भाजपाचे पदाधिकारी यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला..

### देशी झाडांची लागवड....

» शहरात भाजपचे १ हजार ४५० बुथप्रमुख आहेत. या प्रत्येक बुथप्रमुखामार्फत त्या त्या भागात प्रत्येकी पाच झाडांची लागवड करण्यात आली. शहरात शुद्ध हवा आणि ऑक्सिजनचे प्रमाण वाढविण्यासाठी फक्त देशी झाडांचीच लागवड करण्यात आली. त्यामध्ये वड, पिंपळ, चिंच, कडुलिंब, उंबर यांसह अन्य देशी झाडांचा समावेश आहे. हवा शुद्ध करून ऑक्सिजनचे आणि पावसाचे प्रमाण वाढविण्यामध्ये देशी झाडांचा उपयोग होतो. त्यामुळे सर्व बुथप्रमुखांमार्फत देशी झाडे लावण्यात आले. तसेच या झाडांची लागवड करून बुथप्रमुखच ते दत्तक घेऊन संगोपन करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कोल्हेंच्या विजयात खेडचा सिंहांचा वाटा

## शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यामागे उभ्या राहणाऱ्या खेड तालुक्याने कोल्हे यांना मताधिक्य दिले

**पुणे | प्रतिनिधी**

तीन लोकसभा निवडणुकीमध्ये माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यामागे उभ्या राहणाऱ्या खेड तालुक्याने यावेळी त्यांच्या विरोधातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांना सर्वाधिक मताधिक्य देत त्यांच्या विजयात सिंहांचा वाटा उचलला आहे.

आढळरावांच्या २००४ सालच्या पहिल्या विजयात ३२ हजारांच्या मताधिक्यासह खेड तालुक्याचा सिंहाचा वाटा होता. त्यापुढच्या दोन्ही निवडणुकांत हे मताधिक्य वाढते राहिले. गेल्यावेळी, २०१९ च्या निवडणुकीत मात्र ७५०० मतांचे मताधिक्य तालुक्याने डॉ. कोल्हेंना दिले. तालुका आढळरावांपासून बाजूला जात असल्याचा तो संदेश होता. त्यानंतर त्यांनी सावरणे आवश्यक होते, पण ते झाले नाही. त्यातच शिवसेनेत फूट पडली. आढळराव पाटील मुख्यमंत्री शिंदे यांच्या सोबत गेले. शिवसेना कार्यकर्त्यांचा मानस न जाणता, ठराविक समर्थकांना घेऊन ते बाहेर पडले. पण सामान्य शिवसैनिक ठाकरे यांच्यासोबतच राहिला. त्यावेळी त्याचे महत्त्व फारसे लक्षात आले नाही. परिणामी निवडणुकीत गावपातळीवर प्रत्यक्षात काम करणारा कार्यकर्ता त्यांच्याबरोबर राहिला नाही. उलट त्या दुखावलेल्या कार्यकर्त्याने त्वेषाने डॉ. कोल्हेंचे काम केले. आढळरावांबरोबर शिंदे गटात गेलेल्या नेत्यांचा तालुक्यात परिणामकारक प्रभाव पडला नाही.

अतुल देशमुख हे निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटात सामील झाले व त्यांनी महाआघाडीचे उमेदवार कोल्हे यांचा प्रचार केला. तर, जिल्हा परिषद सदस्य व उत्तर पुणे जिल्हा भाजपचे अध्यक्ष शरद बुट्टे पाटील यांनी आढळराव पाटील यांचा जोरदार प्रचार केला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तिन्ही जिल्हा परिषद सदस्यांनी आढळराव पाटील यांचा प्रचार केला. या विधानसभा मतदारासंघातून गेल्या निवडणुकीत डॉ. अमोल कोल्हे यांना ७५०० मतांचे मताधिक्य होते. या निवडणुकीत ते वाढले आणि तब्बल ५५ हजारांवर पोहचले.

आदिवासी, दलित, मुस्लिम व इतर मागास प्रवर्गाची मते महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांना मिळाल्याची चर्चा आहे. ही मते निर्णायक ठरली. कांदा व दुधाचे पडलेले भाव, ज्येष्ठ नेते शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्याबद्दलची सहानुभूती, महायुतीच्या राजकारणाचा राग आणि इतर मागास प्रवर्ग, मुस्लिम व आदिवासी समाजाच्या पाठिंब्यामुळे कोल्हे यांना खेडमध्ये मजबूत मताधिक्य मिळाले. आढळरावांचे पक्षांतर, महायुतीतील पक्षांची कृत्रिम तडजोड, भाजप सरकारच्या विरोधातील रोष आणि गावपातळीवर कट्टर कार्यकर्त्याचा अभाव या बाबींचा आढळरावांना फटका बसला.



### विधानसभेला राष्ट्रवादी चालणार का?

» आगामी विधानसभा निवडणुकीत लोकसभा निवडणुकीचा परिणाम होत नाही, असा आजपर्यंतचा खेडचा अनुभव आहे. कारण, या मतदारसंघातून लोकसभेला शिवसेनेच्या उमेदवाराला मताधिक्य आणि विधानसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराला मतदान, असा गेल्या तीन निवडणुकांचा (सन २०१९ वगळता) अनुभव आहे. यावेळी शिवसेनेचा उमेदवार नव्हता, पण राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा उमेदवार होता.

### तिन्ही घरचा पाहुणा उपाशी

» निवडणुकीच्या तोंडावर नाईलाजाने आढळरावांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जावे लागले. मात्र शिंदे गटात त्यांच्याबरोबर आलेले बहुतांश लोक तेथेच थांबले. त्यांचीही आढळरावांशी असलेली बांधिलकी सैल झाली. दुसरीकडे अनेकदा संघर्ष झाल्यानंतर अचानक त्यांच्याकडे आलेल्या नेत्याशी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा नैसर्गिक बंध जुळला नाही. तसेच भाजप शिवसेना युती असतानाही आढळरावांचा भाजप कार्यकर्त्यांशी फारसा संपर्क नव्हता. परिणामी कोणत्याच पक्षाचा कार्यकर्ता जोमाने त्यांच्यासाठी काम करताना दिसला नाही आणि 'तिन्ही घरचा पाहुणा उपाशी' असे म्हणायची पाळी त्यांच्या संदर्भात आली.

### मतदारसंघातील समस्या

» आळंदी मतदारसंघात पुणे- नाशिक महामार्गावरील, तळेगाव-शिक्रापूर राज्य मार्गावरील आणि नगर- पुणे महामार्गावरील वाहतूक कोंडी ही नेहमीची समस्या आहे. तसेच, कांदा या नगदी पिकाचा पडलेला बाजारभाव हा प्रश्न होता. दुधाचे कमी झालेले भाव हाही मुद्दा परिणामकारक ठरला. चाकण औद्योगिक वसाहतीत स्थानिकांना नोकऱ्या मिळत नसल्याबद्दल असंतोष आहे.

# धानोरी, वडगाव शेरी परिसराला पावसाने झोडपले

## रस्त्यांवर इतके पाणी साचले, चारचाकी वाहने तरंगताना दिसून आली, ठिकठिकाणी वाहतूक कोंडी

**पुणे | प्रतिनिधी**

धानोरी, विश्रांतवाडी, वडगाव शेरी, खराडी परिसराला मंगळवारी जोरदार पूर्वमोसमी पावसाने झोडपले. रस्त्यांवर इतके पाणी साचले होते की, त्यामध्ये चारचाकी वाहने तरंगताना दिसून आली. ठिकठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाले. पुणे शहरासह उपनगरांतही जोरदार पाऊस झाला. धानोरी परिसराला मंगळवारी सायंकाळी पाचच्या सुमारास पूर्व मौसमी पावसाने झोडपून काढले. परिसरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांना ओढ्या-नाल्यांचे स्वरूप आले होते. रस्त्यांवर दोन ते तीन फूट पाणी साठल्याने वाहनचालकांचे प्रचंड हाल झाले. धानोरी गावठाणातील दुकाने, घरे आणि सोसायट्यांत पाणी शिरल्याने व्यावसायिक व नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

वडगाव शेरी परिसरात मंगळवारी झालेल्या जोरदार पूर्व मोसमी पावसामुळे परिसरातील रस्ते जलमय झाले होते. ठिकठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले. तसेच काही नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने त्याच्या संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. दरम्यान, महापालिका प्रशासनाने नाले सफाई केल्याचा दावा या पावसाने फोल ठरला आहे.या भागातील अरनॉल्ड शाळा, टेम्पो चौक, खराडीतील रिलायन्स मार्ट, तसेच नगर रोड, रामवाडी पोलिस चौकी, रामवाडी पेपल सेमिनरी, शास्त्रीनगर आदी ठिकाणी रस्त्यांवर पावसाचे पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली होती.



### धनकवडी परिसरात झाडे उन्मळली

» धनकवडी, आंबेगाव पठार, बालाजीनगर, भारती विद्यापीठ परिसरात वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस झाला. धनकवडी परिसरातील राजमुद्रा सोसायटी, तसेच राऊत बाग परिसरातील काही घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले. तसेच राजमुद्रा सोसायटीत दोन झाडे उन्मळून पडली. यात एक मोटारीचे नुकसान झाले. त्रिमूर्ती चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली होती. परिसरातील नागरिक व वाहनचालकांची या पावसामुळे चांगलीच तारांबळ उडाली.

### क्षेत्रीय कार्यालयाच्या तळघरात शिरले पाणी

» येरवडा परिसरात मंगळवारी जोरदार पाऊस झाल्याने नागरिकांची तारांबळ उडली. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता. येरवडा क्षेत्रीय कार्यालयाच्या तळघरात पावसाचे पाणी शिरले. प्रशासनाने पावसाळापूर्व नाले सफाई केल्याच्या दावा या पावसामुळे फोल ठरल्याचे चित्र दिसून आले. जोरदार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले. यामुळे वाहनचालक व नागरिकांची चांगलीच गैरसोय झाली. रस्त्यांवरील पावसाळी वाहिन्या तुंबल्याने रस्त्यावरून पाणी वाहत होते. प्रशासनाकडून परिसरात नाले, ड्रेनेज व पावसाळी वाहिन्यांची अद्यापही सफाई करण्यात आली नसल्याचे नागरिकांनी सांगितले.